# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**बुधवार, दिनांक ०९ मार्च, २०२२ / फाल्गुन १८, १९४३ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **उप मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **ग्रामविकास, कामगार मंत्री** | |
| **(५)** | **वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **महिला व बालविकास मंत्री** | |
| **(७)** | **मृद व जलसंधारण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४५**

---

### मुंबईतील भायखळा येथील सर जे. जे. रुग्णालयातील वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या प्रलंबित असल्याबाबत

**(१) * ४१०२५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, भायखळा येथील सर जे. जे. रुग्णालयातील सेवानिवृत्त किंवा मृत्यूमुळे सेवा समाप्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या जागी वारसा हक्काने नियुक्त्या देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसा हक्कास लाड-पागे समितीच्या शिफारशीनुसार रुग्णालय प्रशासनाकडे सादर करण्यात आलेल्या अर्जानुसार सन २०१४ पासून नियुक्त्या देण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयाने गठीत केलेल्या समितीने नव्याने तयार केलेल्या ज्येष्ठता यादीतील नियुक्त्या अजूनही प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रलंबित नियुक्त्या लवकरात लवकर होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे आहे.
(४) लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार पात्र असलेल्या वारसदारांना नियुक्त्या देण्याबाबत वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने सादर केलेल्या प्रस्तावावर सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय घेण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सडे (ता.पोलादपूर, जि. रायगड) येथील कांगोरा मंदिरा समोर सभामंडप बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळण्याबाबत

**(२) * ३९८९१ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सडे (ता. पोलादपूर, जि. रायगड) याठिकाणी शिवकालीन ऐतिहासिक कांगोरीगड/मंगळगड असून व तेथे ऐतिहासिक शिवकालिन कांगोरी मंदिर तेथे असून अनेक ऐतिहासिक वस्तू ठेवण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वागीण विकासासाठी ऐतिहासिक किल्ले कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिनी यांनी दिनांक १८ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.वित्त, मंत्री यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कांगोरी मंदिर व तेथे कोरीव नक्षिकाम केलेले ८ पाण्याचे तलाव पाहण्याकरिता इतिहास संशोधक ,शाळा, महाविद्यालये तसेच सामाजिक संघटना यांच्या सहली सतत गडावर येत असून या गडाचे जतन व संवर्धन व सांस्कृतिक कार्यक्रम गेली ४५ वर्ष कांगोरीगड /मंगळगड संवर्धन समितीच्या वतीने केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त समितीसुध्दा पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक किल्ले कांगोरी मंदिर समोर सभामंडप (शेड ) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान मिळणेबाबत संबंधित विभागाकडे सातत्याने मागणी करीत आहे हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धन व सांस्कृतिक कार्य अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कायआहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय. हे खरे आहे.

कांगोरी किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून भारतीय पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत आहे. हा किल्ला बहुतांशी उध्वस्त झाला असून फक्त तटबंदी शाबूत आहे. तटबंदीच्या आत मंदिराचे अवशेष आणि दगडी कुंड आहे.

(२) हे खरे आहे.

(३) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(४) व (५) कांगोरीगड/ मंगळगड संवर्धन समितीने दि.११.११.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पर्यटनाच्या दृष्टीकोनातून सर्वांगीण विकासासाठी ऐतिहासिक कांगोरा मंदिर समोर सभामंडप (शेड) बांधणे व गडकिल्ले जतन आणि संवर्धनासाठी व सांस्कृतिक कार्यासाठी अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे. त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत संबधित यंत्रणेस कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पायरवाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथै आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(३) * ४०५५४ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पायरवाडी (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील ६ वर्षीय मुलाचा मृतदेह ३५ ते ४० कि.मी. अंतरावरील त्या गावात नेण्यासाठी पैशांअभावी शासकीय दवाखान्यातील रुग्णवाहिका उपलब्ध न झाल्याने मृतदेह बाइकवरुन न्यावा लागल्याची घटना माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दोन कंत्राटी रुग्णवाहिका चालकांना तत्काळ निलंबित करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी समितीव्दारे सुरु असून चौकशीच्या अहवाल जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, त्यानुसार दोषींवर कारवाई करण्यासह ग्रामीण भागातील सरकारी रुग्णालयाची परिस्थिती सुधारण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२), (३) व (४) रुग्णवाहिकेतून मृतदेह वाहून नेण्याचे प्रावधान नाही. मृतदेह वाहतुकीसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे शववाहिका उपलब्ध असतात. तथापि मयत रुग्णाच्या नातेवाईकांनी केलेल्या तक्रारी अनुषंगाने जिल्हा शल्यचिकित्सक, पालघर यांनी चौकशी अधिकारी नेमून सदर प्रकरणी चौकशी सुरु केली आहे. कार्यरत असलेले रुग्णवाहिका चालक हे जे.एस.एस.के अंतर्गत कंत्राटी शकॉम मेडिया इंडिया प्रा.लि. भोपाळ या संस्थेमार्फत पुरविण्यात आलेले आहेत. सदरील वाहन चालकांच्या जागी तात्काळ तीन वाहनचालक उपलब्ध करुन देण्याविषयी ऐशकॉम मेडिया इंडिया

प्रा.लि. भोपाळ यांना कळविण्यात आले आहे.

मोखाडा तालुक्यात ग्रामीण रुग्णालय मोखाडा, उपजिल्हा रुग्णालय जव्हार आणि ०४ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. यावर्षी ता.मोखाडा ग्रामीण रुग्णालय व प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी नवीन रुग्णवाहिका देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिराळा (जि.सांगली) तालुक्यातील चांदोली धरणाच्या डाव्या कालव्याची व त्यावरील पोट कालव्यांमधून होणारी गळती थांबविण्याबाबत

**(४) * ४१७२८ डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिराळा (जि. सांगली) तालुक्यातील चांदोली धरणापासून सुरु होणाऱ्या ० ते २६ किलोमीटरच्या वारणा डाव्या कालव्याच्या व पोट कालव्याच्या गळतीमुळे तेथील १० हजार अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन नापीक झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गळतीमुळे बाधित होणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना कोणतेही पीक घेता येत नसल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत असून त्यांचेवर उपासमारी व मजूरी करण्याची वेळ आली असतानाही पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांकडून गळती थांबविण्यासाठी कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार बाधीत शेतकऱ्यांना अर्थिक मदत देण्यासह कालव्यातून जमिन क्षेत्रामधे होणारी गळती थांबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

मुख्य कालव्यामधून पाझरून तसेच कालवा विमोचकामधून पाणी येत

असल्याने अंदाजे ५० हेक्टर क्षेत्र नापीक होत आहे व कालवा विमोचकाची दुरूस्ती यांत्रिकी विभागामार्फत प्रगतीत आहे.

(२) नाही.

(३) कालवा विमोचकाची दुरूस्ती विभागाच्या यांत्रिकी संघटनेमार्फत करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या शहरी भागात वाढत असलेले कुपोषणाचे प्रमाण

**(५) * ४०१५८ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामीण भागाप्रमाणेच आता शहरी भागामध्ये बालकांच्या कुपोषणाच्या प्रमाणात वाढ होत असल्याची बाब निदर्शनास आली असून सद्यस्थीतीत ६ लाख १६ हजार बालके कुपोषीत असून त्यापौकी ४ लाख ५८ हजार बालके अतीकुपोषीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सहा महिन्यात वसई-विराराच्या शहरी व ग्रामीण भागात १०८ अतितीव्र कुपोषित बालके व ८२७ मध्यम , प्रगत जिल्हा म्हणून ओळखला जाणारा पुणे जिल्हयात कुपोषित बालकांमध्ये तिप्पट वाढ झाली असून ४०० अतितीव्र कुपोषित बालके व १६९४ मध्यम तसेच मुंबई शहरात ५ हजाराहून अधिक कुपोषीत बालके त्याचबरोबर अमरावती, भंडारा, गोंदीया, नंदूरबार, गडचिरोली या जिल्हयातही लाखो बालके कुपोषीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कुपोषणाचे वाढत जाणारे हे प्रमाण रोखण्यासाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरू करण्यासह इतर कोणत्या उपाययोजना शासनाने केल्या वा

करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :**
(१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर २०२० व डिसेंबर २०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील ग्रामीण भागातील ४४९ प्रकल्पामधील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०२० | ४९७४३८३ | ४५१२७३६ | ३८८६३५ | ७३०१२ |
| डिसेंबर २०२१ | ४९१४३९५ | ४४९३१३९ | ३५१९४४ | ६९३१२ |

माहे डिसेंबर २०२० व डिसेंबर २०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार राज्यातील नागरी भागातील १०४ प्रकल्पामधील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| कालावधी | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| डिसेंबर २०२० | ११०५७९४ | ९५२३४२ | १३७३१३ | १६१३९ |
| डिसेंबर २०२१ | १२४६६३० | ११२९६७१ | १०४३६७ | १२५९२ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता माहे डिसेंबर २०२० पेक्षा माहे डिसेंबर २०२१ या वर्षाच्या मासिक प्रगती अहवालानुसार कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले आहे.
(२) हे खरे नाही.

माहे डिसेंबर २०२१ च्या मासिक प्रगती अहवालानुसार वसई विरार येथील शहरी व ग्रामीण भागातील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| प्रकल्पाचे नाव | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| वसई | १८१६९ | १७३०० | ७५२ | ११७ |
| वसई २ | १५०१३ | १२६१६ | २०९५ | ३०२ |

पुणे, मुंबई, अमरावती, भंडारा, गोंदिया, नंदूरबार, गडचिरोली येथील कुपोषणाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | वजन घेतलेली एकूण बालके | सर्वसाधारण बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके |
|---|---|---|---|---|
| पुणे | ३९२४६६ | ३७१०२२ | १९१३६ | २३०८ |
| मुंबई | ३३०९०४ | २९६८१३ | ३०८३३ | ३२५८ |
| अमरावती | ३०५१९६ | २८७०६८ | १५८४२ | २२८६ |
| भंडारा | ७३५३१ | ६८३०० | ४३९० | ८४१ |
| गोंदिया | ८९८३३ | ८०७०५ | ७३९१ | १७३७ |
| नंदूरबार | १३४४९८ | ९२११७ | ३३०७३ | ९३०८ |
| गडचिरोली | ८२३३१ | ६४४७७ | १४०२८ | ३८२६ |

(३) कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत-

(१) एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत ६ महिने ३ वर्ष वयोगटातील बालकांना, गरोदर, स्तनदा मातांना THR व ३ ते ६ वयोगटातील बालकांना गरम ताजा आहार देण्यात येतो.

(२) तसेच आदिवासी प्रकल्पामध्ये अमृत आहार योजना सुरु असून ह्या योजने अंतर्गत गरोदर स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यात येतो.

(३) तसेच अमृत आहार योजनेंतर्गत ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी व शाकाहारी बालकांना प्रति दिन २ केळी व मांसाहारी बालकांसाठी १ अंडी देण्यात येतात.

(४) अमृत आहार योजनेंतर्गत गरोदर, स्तनदा माता यांच्यासाठी प्रति लाभार्थी एक वेळचा चौरस आहारासाठी खर्च रु. ३५/- व ६ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना अंडी/केळी यासाठीचा प्रति लाभार्थी नियमित आहाराव्यतिरिक्त ६/- रु. खर्च करण्यात येतो.

(५) तसेच राज्यातील सॅम बालकांसाठी ग्राम बाल विकास केंद्र सुरु करण्यात आली आहेत. ग्राम बाल विकास केंद्रामध्ये तीन वेळचा अतिरीक्त आहार व आरोग्य खात्यामार्फत औषधोपचार करण्यात येतात.

(६) राज्यात पोषण अभियान अंतर्गत अंगणवाडी केंद्रातील बालकांचा, किशोरवयीन मुली व महिलांचा पोषणाचा दर्जा सुधारण्यासाठी व कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी  विविध स्तरावरुन निरंतर शिक्षण वृध्दी दृष्टीकोन (ILA) समुदाय आधिरित कार्यक्रम (CBE), रिअल टाईम मॉनिटरींग (ICT-RTM) व जन आंदोलन इत्यादी उपक्रम राबविण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १८ शासकीय रुग्णालयातील अनुभवी फार्मासिस्ट यांना सेवाज्येष्ठतेनूसार पदोन्नती देण्याबाबत

**(६) * ३७७९५ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील १८ शासकीय रुग्णालयातील फार्मासिस्ट हे रुग्णसेवेत योगदान

देऊनही मागील दोन वर्षापासून त्यांना सेवाज्येष्ठतेनूसार पदोन्नती नाकारण्यात येत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवाज्येष्ठतेनूसार तिसऱ्या श्रेणीतून दुसऱ्या श्रेणीत नियुक्ती केली जावी ही मागणी गेल्या १५ वर्षापासून नाकारली जात असल्याने आरोग्य शिक्षण व संशोधन संचालनालयाशी संलग्न १८ शासकीय रुग्णालयातील फार्मासिस्ट मागील अनेक महिन्यांपासून निवेदने, उपोषण व निषेध मोर्चाद्वारे आपल्या मागण्या शासनाकडे करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासकीय रुग्णालयातील दुसऱ्या श्रेणीतील फार्मासिस्टसाठी आवश्यक पात्रता असतानाही लोकसेवा आयोगामार्फत उमेदवारांची नियुक्ती करण्याऐवजी अनुभव असणाऱ्या शासकीय रुग्णालयातील तिस-या श्रेणीतील फार्मासिस्टची नियुक्ती का करण्यात येत नाही,

(४) असल्यास, राज्यातील १८ शासकीय रुग्णालयातील रुग्णसेवेत योगदान देणाऱ्या अनुभवी फार्मासिस्ट यांना सेवाज्येष्ठतेनूसार तिसऱ्या श्रेणीतून दुसऱ्या श्रेणीत पदोन्नती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सेवाप्रवेश नियमानुसार औषधनिर्माता, गट-ब हे पद पदोन्नतीने भरण्याची तरतूद नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## निळवंडे-शिर्डी-कोपरगाव, (जि.अहमदनगर) ही बंदिस्त पाईपलाईन कार्यान्वित करण्याबाबत

**(७) * ३७७०३ श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण**

**विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) "निळवंडे-शिर्डी-कोपरगाव (जिल्हा अहमदनगर) या बंदिस्त पाईपलाईन योजनेस सन २०१५ च्या सुमारास शासनानची मंजूरी मिळालेली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने सदर योजनेस श्री.साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था मार्फत ठराव होऊन सुमारे २८० कोटी रूपये निधी मंजूर होऊन सदर कामासाठी ई-निविदा प्रसिध्द झाली होती, हे खरे आहे काय,

(३) निळवंडे धरणाच्या उच्च स्तरीय कालव्यांचे शासनाने मंजुर केलेला निधी अद्यापही प्रलंबित आहे तसेच अकोले तालुक्यात सुरु असलेल्या जलसेतूचे प्रलंबित काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणते नियोजन केले आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल होऊन सुनावणी झाल्यानंतर मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाकडून सदर योजनेस असलेली मंजुरी कायम ठेवली गेली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त योजना ही कार्यान्वित होण्यासाठी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, सिंचन भवन, नाशिक यांच्याकडून कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांना जो पत्रव्यवहार झाला यामध्ये निळवंडे-शिर्डी-कोपरगाव या बंदिस्त पाईपलाईन योजनेला मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांची स्थगिती आहे असा उल्लेख आहे तथापि सदर प्रकरणी न्यायालयाची स्थगिती नसतानाही, याबाबत दिशाभूल करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी मध्ये काय आढळून आले, तदअनुषंगाने उक्त निळवंडे-शिर्डी-कोपरगाव ह्या पिण्याच्या पाण्याच्या बंदिस्त पाईपलाईन योजनेचा आढावा घेऊन ती कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या व करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे :** (१)  हे अंशत: खरे आहे,

शासनाच्या दिनांक ३१/०८/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढीव शिर्डी संस्थान पाणी पुरवठा योजना(निळवंडे धरण उद्भव घेवून) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाद्वारे राबविण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, संस्थानाने केलेल्या विनंतीनुसार सदर संपूर्ण योजना संस्थानामार्फत राबविण्यास तसेच या योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास शासनाच्या दि.१/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये  मान्यता देण्यात आली. तसेच दि.७/२/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजनेत शिर्डी नगरपंचायत आणि कोपरगांव नगरपालिका यांचा समावेश करुन संयुक्त पाणीपुरवठा योजनेच्या वाढीव श्री साईबाबा संस्थान शिर्डी, नगरपंचायत शिर्डी आणि कोपरगांव नगरपालिका संयुक्त पाणी पुरवठा योजनेस रु.२६०.३९ कोटी इतक्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यात टप्पा क्र.१ मध्ये शिर्डी परसिरातील करावयाची कामे तर टप्पा-२ मध्ये  निळवंडे धरण ते मौजे कनकुरी संस्थान जल शुध्दीकरण केंद्र,शिर्डी नगरपंचायत ते कोपरगांव नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र पर्यंत पाईपलाईन टाकणे या कामाचा समावेश आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

टप्पा-१ साठी अंदाजे रु.२७,१३,०३,९८०/- व टप्पा-२ साठी अंदाजे मुल्य रु.२०५,५९,८०,८०४/- करीता स्वतंत्र निविदा शिर्डी संस्थानमार्फत प्रसिध्द करण्यात आल्या.

(३) निळवंडे प्रकल्पासाठी नियोजनानुसार शासनाकडून पुरेश्या प्रमाणात निधी उपलब्ध आहे.उच्च स्तरीय कालव्याची कामे व अकोले तालुक्यात सुरु असलेल्या जलसेतूचे प्रलंबित कामे  ऑक्टोबर २०२२ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) होय,

जनहित याचिका क्र.१३३/२०१६ मधील दिवाणी अर्ज क्र.१४८४५/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.१९/१२/२०१९ च्या आदेशान्वये टप्पा क्र.२ च्या कामास परवानगी दिली आहे.

(५) सदर पत्रव्यवहार उक्त योजना कार्यान्वित करण्याशी संबंधित नसल्यामुळे दिशाभूल करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(६) चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

जनहित याचिका क्र.१३३/२०१६ मधील दिवाणी अर्ज क्र.१४८४५/२०१८ मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी टप्पा क्र.२ च्या कामास दि.२०.१२.२०१८ च्या आदेशान्वये पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली होती. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाने दि.१९.१२.२०१९ च्या आदेशाने सदर टप्पा क्र.२ च्या कामास परवानगी दिली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या विरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका (दिवाणी) क्र.१०६५४/२०२० दाखल आहे. सध्या सदर प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे. तसेच निळवंडे धरण उद्भव घेऊन वाढीव शिर्डी संस्थान, कोपरगांव नगरपरिषद व शिर्डी नगरपंचायत संयुक्त पाणी पुरवठा योजनेचे पाणी आरक्षणाविषयी महाराष्ट्र वॉटर रिसोर्सेस रेग्युलेटरी ऑथॉरिटी यांचेसमोर श्री.दिलीप विठ्ठल कासार व इतर यांनी महाराष्ट्र शासन व इतर यांचे विरूध्द एम.डब्ल्यु.आर.आर.ए./२०२०/लिगल/केस/नं. (२०२०) ६१४ हे पिटीशन दि.२७.१०.२०२० रोजी दाखल केले आहे.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ ( जि.ठाणे) मांगरूळ तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र येथील समस्ये बाबत

**(८) * ४०८७२ श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) तालुक्यातील मांगरुळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे तालुक्यातील ग्रामीण परिसरामधील ५० गावांना आरोग्य सेवा देणारे एकमेव आरोग्य केंद्र असून सदर रुग्णालयाचे छताचे प्लास्टर खाली कोसळल्यामुळे इमारत बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंद रुग्णालयाची दुरुस्ती न केल्यामुळे परिसरातील गरीब रुग्णांना नाईलाजास्तव दूरच्या रुग्णालयात स्वखर्चाने जावे लागत असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, सदरील प्राथमिक आरोग्य केंद्राकरिता तेथील शेतकऱ्यांनी स्वतःची जमीन दान दिलेली होती परंतु, महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागाने या शेतकऱ्याच्या संपूर्ण जागेवरच आरोग्य केंद्रांची नोंद केल्यामुळे मा.न्यायालयात सदर शेतकऱ्याने याचिका दाखल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४)असल्यास, यासंदर्भात शेतकऱ्याच्या जमिनीच्या प्रश्नासंदर्भात तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राचे नुतनीकरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) प्राथमिक आरोग्य केंद्र मांगरुळ कार्यक्षेत्रांतर्गत २५ गावे व १६ पाडे आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्र मांगरुळ च्या छत व इमारत दुरुस्तीचे काम सन २०१५-१६ मध्ये सुरु केले असता विकासक व सदरील जमीन मालक यांच्यात वाद झाल्याने विकासकाने काम अर्धवट सोडल्यामुळे दरवर्षी पावसाळयामध्ये छत गळती होवून रुग्णालयाची छताची प्लास्टर खाली कोसळत असल्याने इमारतीचा काही भाग बंद करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही. प्राथमिक आरोग्य केंद्र मांगरुळ ची इमारत धोकादायक असल्याने बाह्यरुग्ण विभाग व आपतकालीन कक्ष हा प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी निवासस्थानामध्ये स्थलांतरीत करण्यात आला असून सदर ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रातील येणाऱ्या रुग्णांना नियमित आरोग्य सेवा पुरविण्यात येते.

(३) व (४) जमिनीच्या हस्तांतरणाबाबत वाद असल्याने दिनांक १३ डिसेंबर, २०१९ व दि. १९ ऑक्टोबर, २०२० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे, बांधकाम समिती, संबंधित जिल्हा परिषद सदस्य व जागा मालक यांचे वारस यांच्यामध्ये झालेल्या सभेत प्रथम जागा मालक यांचे वारसदार यांनी जागा मोजून घेवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी अशी

चर्चा झाली. त्यानुसार सदरील जागेची भुमिअभिलेख यांच्याकडून दि.१६ मे, २०२१ रोजी मोजणी केली असून जागा जिल्हा परिषद ठाणे यांचे नावे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घूम-रूद्रवट (ता.म्हसळा, जि.रायगड) येथील रस्त्यांची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ४०४६८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घूम-रूद्रवट (ता.म्हसळा, जि.रायगड) या दोन गावांसाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत नवीन रस्त्याच्या कामाला एक कोटी रुपयांचा निधी मंजूर होवून दोन वर्षापेक्षा जास्त कालावधी होवून सुद्धा अद्याप कामाला सुरूवात झाली नसल्याने संबंधीत कंत्राटदाराकडून काम काढून घेण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू ठिकाणी नवीन कंत्राटदाराकडून माहे जानेवारी २०१९ मध्ये कामाची सुरूवात होणे गरजेचे असताना कंत्राटदाराने रस्त्याच्या दोन्ही बाजुला साईडपट्टी खोदुन ठेवल्यामुळे तसेच दोन्ही गावाना जोडणाऱ्या नदीवरील मुख्य साकवचीही डागडुजी अर्धवट ठेवल्यामुळे अपघातसदृष्य परिस्थिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून घुमफाटा ते रूद्रवट गावापर्यंत मंजूर रस्त्याचे प्रलंबीत काम तातडीने पूर्ण करण्याबाबत तसेच दिरंगाई करणाऱ्या कंत्राटदाराविरुध्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

प्रथम मक्ता कालावधीत सदर पुलाचे काम करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रथम मक्तेदाराने वेळेत काम पुर्ण न केल्यामुळे मक्ता रद्द केला असून सदर कामाच्या फेरनिविदेची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## नांझा (ता.कळंब जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झालेबाबत

**(१०) * ४०३९६ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांझा (ता.कळंब जि.यवतमाळ) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील शस्त्रक्रियागृहाचे नुतनीकरण व बांधकाम करण्यात आले परंतू पावसाळयामध्ये या कक्षामध्ये ठिकठिकाणी पाणी गळत असल्याने सदर काम निकष्ट दर्जाचे झाले असल्याचे दिनांक २५ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रास परिसरातील जवळपास २० ते २५ गावे जोडलेली असून येथील आदिवासी गरीब कुटूंब आरोग्याच्या सुविधा घेण्यासाठी याच केंद्रात येत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासानाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार निकृष्ट दर्जाचे बांधकाम करण्याऱ्या सबंधीत कंत्राटदार तसेच या कामाकडे दूर्लक्ष करण्याऱ्या विभागीय कर्मचाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.
(२) प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत १० उपकेंद्र असून ४६ गावे समाविष्ट आहेत, तथापि, ३७ गावांमध्ये आदिवासी कुटुंब असुन संबंधित कुटुंबाना आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात.
(३) (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडा (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कोरडवाहू शेतजमिनीला बारमाही पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(११) * ३८७७६ श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या कोरडवाहू शेतजमिनीला बारमाही पाणी उपलब्ध होण्याकरिता दाहे येथील माती बंधाऱ्याचे काम गेल्या ३० वर्षापासून विविध कारणांमुळे बंद असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाडा तालुक्यातील वैतरणा, तानसा, पिजांळ व गारगाई या बारमाही वाहणाऱ्या नद्यांवर १० कि.मी. अंतरावर मोठे बंधारे बांधण्याबाबत येथील शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी अनेक वर्षापासून मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री, मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा इ. कडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करुन ही कोणतीही कार्यवाही झाली नसल्याने शेतकरी सिंचनापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गेल्या काही वर्षात जलसंधारण योजनेंतर्गत या तालुक्यातील नद्यांवर बांधण्यात आलेल्या कोकण बंधाऱ्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे बंधाऱ्याला गळती लागून दरवर्षी मार्च अखेर बंधाऱ्यात पाणी शिल्लक राहत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दाहे बंधाऱ्याचे काम पूर्ण करुन वाडा तालुक्यातील नद्यांवर मोठे बंधारे बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. मा.लोकप्रतिनिधीनी लेखी निवेदनाद्वारे मागणी केल्यानुसार गारगाई नदीवर ३ बंधारे पूर्ण करण्यात आले. तसेच गारगाई

नदीवर १ बंधारे व वैतरणा नदीवर २ बंधारे बांधणेबाबत कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

(४) पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगाई नदीवर शिलोत्तर बंधारा, कारंजे व परळी बंधारा पुर्ण करण्यात आले आहे. धारणवाडी बंधाऱ्याचे सर्वेक्षण व अन्वेषण करून प्रशासकीय मान्यता घेवून निविदा कार्यवाही करण्यात येत आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील वैतरणा नदीवर सोनाळे, अंबिस्ते समिंट बंधाऱ्याचे सर्वेक्षण व अन्वेषण झाले आहे. सोनाळे बंधाऱ्याचे पाणी उपलब्धता प्रमाणपत्र प्राप्त करून प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही प्रस्तावित आहे.

दाहे योजना पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील असून वन जमिन असल्यामुळे वन कायदा १९८० लागू झाल्यामुळे काम बंद आहे. सदर योजनेचे धरणाचे ३५ % काम पुर्ण करण्यात आलेले आहे. सदर योजना जलसंपदा विभागाकडून जलसंधारण विभागाकडे सन १९९४ ला हस्तांतरीत झालेली आहे. सदर योजनेच्या माती धरणाचे संकल्पन प्रस्ताव मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांच्याकडून प्राप्त झाल्यावर या योजनेस सुधारीत प्रशासकीय मान्यता घेवून योजनेचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्यात येईल

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालायत नियमबाह्यरित्या यंत्र सामुग्री खरेदी केल्याबाबत

**(१२) * ३८४८० श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील येथील सर जे.जे. रुग्णालयातील तत्कालीन अधिक्षक यांनी सन २०१७-१९ या कालावधीत पदाचा दुरुपयोग करुन नियमबाह्य रित्या १ कोटी ४१ लाख ७५ हजार रुपयाची अनावश्यक यंत्रसामुग्री अधिकार नसतानाही तसेच वित्त विभागाची मान्यता न घेता खरेदी करुन गैरप्रकार व

अनियमितता केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नेमण्यात आलेल्या डॉ.भोसले यांच्या चौकशी समितीने अहवाल अद्‍याप शासनास सादर केला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी समितीला अहवाल शासनास सादर करण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) तसेच, उक्त प्रकरणी जर चौकशी अहवाल सादर झाला असल्यास तर त्याचे निष्कर्ष काय आहेत, त्यानुसार संबंधित दोषिंविरुद्‍ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे
(२) हे खरे आहे.
(३) संपूर्ण राज्यात कोव्हीड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे लॉकडाऊन घोषित करण्यात आलेले असल्यामुळे सदर कालावधीत अपुरे मनुष्यबळ व सर्व शासकीय यंत्रणा कोव्हीड-१९ महामारीच्या रुग्णसेवेकरीताच कामकाज केले जात असल्याने शासकीय यंत्रणेवर आलेला ताण या सर्व बाबींमुळे चौकशीस विलंब झालेला आहे
(४) व (५) संचालनालय स्तरावर त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली असून त्यानुषंगाने चौकशीची कार्यवाही सुरु आहे

-----------------

## उस्मानाबाद जिल्हयात इमारत व इतर बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनेमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१३) * ४०२७२ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्हयात इमारत तसेच इतर बांधकाम कामगारांसाठी शासनाने राबविलेल्या कल्याणकारी योजनेमध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार

झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले , हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये लाभार्थ्यांच्या यादीमध्ये जमिनदार, बागायतदार, ग्रामपंचायत सदस्य , शालेय विद्यार्थी, तसेच सधन व्यक्तीचा समावेश केला असल्याने गोर-गरिब कामगारांऐवजी बोगस लाभार्थ्यांनीच सर्वाधिक लाभ घेतला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांमध्ये दलालामार्फत बोगस कामगार दाखवून शासनाची फसवणूक केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्याअनुषंगाने गैरव्यवहार करण्याऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचारी व दलालावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुसद (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयात अत्यावश्यक आरोग्य सोयी-सुविधा पुरविण्याबाबत

**(१४) * ४०६२२ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद (जि.यवतमाळ) येथील उपजिल्हा रुग्णालयात जीवनदायी औषधाचा तुटवडा असणे, अपघातग्रस्त, थॅलेसेमिया व प्रसुतीसाठी आलेल्या महिलांना रक्ताचा पुरवठा खासगी रुग्णालयातून होत असणे, बाहय रुग्ण

विभागात (ओपीडी) विशेषज्ञ( स्पेशालिस्ट) व वैद्यकीय डॉक्टराची कमतरता, एक्स-रे मशिन बंद असणे, सोनोग्राफी व सीटी स्कॅन सुविधा उपलब्ध नसणे यासारख्या अत्यावश्यक शासकीय आरोग्य सुविधा रुग्णांना उपलब्ध नसल्याने याबाबत स्थानिक नागरिकांनी व नगरसेवकांनी शासनाकडे तक्रारी केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार येथील रुग्णांना अत्यावश्यक आरोग्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व त्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सीटीस्कॅन आणि सोनोग्राफी मशिन सुविधा ५० खाटांच्या रुग्णालयाच्या निकषात बसत नसल्याने, सदर सुविधा या रुग्णालयास उपलब्ध नाहीत. तसेच ब्लड स्टोरेज युनिट सुरु करण्याकरिता वैदयकिय अधिकारी यांना प्रशिक्षण देऊन ब्लड स्टोरेज युनिट सुरु करण्याची कार्यवाही चालु आहे.

(२) सदर रुग्णालयाकरिता औषधी उपलब्ध आहेत. बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ, भुलतज्ञ, नेत्रतज्ञ यांच्या सेवा उपलब्ध आहेत. मोबाईल क्ष किरण मशीन दुरुस्त करुन घेण्यांत आले असुन ते कार्यान्वीत आहे. सीटीस्कॅन आणि सोनोग्राफी मशिनची सुविधा ५० खाटांच्या रुग्णालयाच्या निकषात बसत नसल्याने सदर सुविधा उपलब्ध नाही.परंतु आवश्यकता असल्यास जवळच्या शासकिय वैदयकिय महाविदयालयात रुग्णांना संदर्भित करण्यात येते.

गरोदर महिलांसाठी शहरातील रक्त पेढीमार्फत मोफत रक्तपुरवठा उपलब्ध आहे. सदर रुग्णालयाचे श्रेणीवर्धन मंजूर असून अनुदान मंजूर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेठ (जि. नाशिक) तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी शासकीय योजनेत निधीचा गैरवापर केल्याबाबत

**(१५) * ३७७८१ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेठ (जिल्हा नाशिक) तालुक्यातील कृषी अधिकाऱ्यांनी बनावट कागदपत्रे सादर करून सुमारे ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक ८ जानेवारी,२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकार हा सन २०११ ते २०१७ या कालावधतील असून यामध्ये सुमारे १४७ शेतकऱ्यांची व शेतमजुरांची फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणातील संशयित १६ जणांविरुद्ध पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला असून यामध्ये तत्कालीन कृषी अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय , त्यानुसार संबंधितांवार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) अंशतः खरे आहे.

दि. ८ जानेवारी, २०२२ रोजी स्थानिक वृत्तपत्रामध्ये अशा आशयाचे वृत्त प्रसिद्ध झाले आहे.

तालुका कृषि अधिकारी, पेठ कार्यालयांतर्गत सन २०११-१७ या कालावधीत गतिमान पाणलोट योजनेअंतर्गत रू.७,२५,६४,०००/- आणि एकात्मिक पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत रक्कम रू.१२,७३,९३,०००/- अशी एकूण रक्कम रू.१९,९९,५७,०००/-खर्च झालेली आहे. त्यामुळे, रुपये ५० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे म्हणणे संयुक्तिक नाही.

(२) हे खरे नाही.

सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्या आदेशानुसार त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर चौकशी समितीच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये तथ्य असल्याचे आढळून आलेले नाही.

(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कनिष्ठ न्यायालय, पेठ, जिल्हा नाशिक यांच्या आदेशानुसार मूळ तक्रारीत उल्लेख केलेल्या १६ कृषि अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूद्ध पोलीस स्टेशन, पेठ येथे गुन्हा दाखल करून त्यापैकी ०३ अधिकारी/कर्मचाऱ्यांविरूद्ध अटकेची कार्यवाही करण्यात आली होती. त्याअनुषंगाने, कृषि पर्यवेक्षक, करंजाळी यांना विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक कार्यालयाने दि.७/१/२०२२ पासून मानीव निलंबीत केले आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयात रक्त विलगीकरण कक्ष स्थापन करणेबाबत

**(१६) * ३८१४० ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जिल्हा बुलढाणा) येथील सामान्य रुग्णालयात रक्त विलगीकरण कक्ष स्थापन करणेबाबत सामान्य रुग्णालय, खामगाव यांनी त्यांचे पत्र क्रमांक सा.रु.खा/रक्तपेढी/ ३५३६-४० दिनांक ३०/७/२०२० नुसार प्रस्ताव सहसंचालक, ब्लड सेल रक्तकोष, मुंबई यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.
खामगाव (जि.बुलढाणा) येथील सामान्य रूग्णालयाने रूग्णालयात रक्त विलगीकरण कक्ष स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य रक्त संक्रमण परिषद, मुंबई यांना ईमेलद्वारे दि. २५.०२.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.
(२) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्हा रूग्णालयात एक रक्त विलगीकरण कक्ष असणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा रूग्णालय, बुलढाणा येथे विलगीकरण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. सामान्य रूग्णालय खामगांव यांनी आवश्यकतेनुसार या कक्षाकडून रक्त घटक घेणे अभिप्रेत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्हयातील सुर्या धरणाचे पाणी रेल्वे क्रॉसिंग करुन नेण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१७) * ४१०७० श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील सुर्या धरणाचे पाणी डहाणू व वानगावच्या पश्चिमेस रेल्वे क्रॉसिंग करुन पाईपलाईनद्वारे नेऊन तेथील आदिवासी पाडयातील ओढे व नाल्यांमध्ये सोडण्याचा प्रकल्प सन २००६ मध्ये हाती घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षात ९० टक्के काम पूर्ण होऊनही सुर्या धरणाचे पाणी रेल्वे क्रॉसिंग करुन पश्चिमेला नेण्याचे काम प्रलंबित असल्यामुळे पश्चिमेकडील प्रगत शेतकऱ्यांना शेतीच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय.
(३) असल्यास, सदर प्रकणाची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त ठिकाणचे प्रलंबित काम तातडीने पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) पालघर जिल्हयातील सुर्या धरणाचे पाणी डहाणू व वानगावच्या पश्चिमेस रेल्वे क्रॉसिंग करुन पाईपलाईन द्वारे नेउन त्याद्वारे आदिवासी पाड्यातील ओढे व नाल्यामध्ये सोडण्याच्या प्रकल्पांमधील खालील कामांचा समावेश आहे.

(१)पश्चिम रेल्वे ओलांडा, मोगरबाव ओलांडा व मजिप्रा जलवाहिणी ओलांडा (Box Pushing) चे काम मार्च २०२१ मध्ये पूर्ण केले आहे.

(२) तसेच लघुपाट क्र. ६ च्या सा. क्र. १५८० मी. पासुन नाला Outfall पर्यंत ३४०० मी लांबीत भुअंतर्गत ९०० मीमी व्यासाची लोखंडी नलिकेचे काम सा. क्र. ३०७० पर्यंत काम पुर्ण केले आहे. तथापि उर्वरीत लांबीतील काम भुधारकांच्या विरोधामुळे पुर्ण करण्यात आलेले नाही. उर्वरीत कामे भूधारकांच्या अडचणींचे निराकरण करुन सदर काम माहे मे २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घाटी (जि.औरंगाबाद) येथील शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये औषधासाठी तरतूद (बजेट) वाढविण्याबाबत

**(१८) * ४१३४५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटी (जि.औरंगाबाद) येथील शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालयामध्ये मराठवाड्यासह १४ जिल्हयातून दरवर्षी जवळपास सात लाख रुग्ण उपचारासाठी येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या सात वर्षांपासून या रुग्णालयाचे औषधांचे बजेट ५ कोटी रुपये असून रुग्णसंख्या वाढूनही तूलनेने औषधासाठी असणारी तरतूद (बजेट) वाढत नसल्याने परिणामी रुग्णांना औषधे बाहेरून मागवावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सद्यस्थित औषधांचा पुरवठा कमी असल्यामुळे नवीन अडीच कोटी रुपयांच्या औषधांचा प्रस्ताव या रुग्णालयाने सादर केला आहे,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी याचे औषधासाठी तरतूद (बजेट) वाढविण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे आहे.

(२) नाही.

(३) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद यांनी जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत रु. २.५० कोटी एवढ्या निधीची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

(४) सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात तरतूद वाढवून देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ कलावंतांना मिळणाऱ्या मानधनाच्या प्रस्तावांना मंजुरी मिळण्याबाबत

**(१९) * ३७९६३ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे जिल्ह्यातील ३७० ज्येष्ठ कलावंतांना मानधन मिळावे यासाठी प्रस्ताव सादर केले असल्याचे दि. १० जानेवारी २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुमारे दोन वर्षापासून या प्रस्तावांना मंजुरी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्येष्ठ कलावंतांचे मानधनाचे प्रस्ताव कधीपर्यंत मंजूर करण्यात येणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३ ) व (४) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय, दिनांक १८ जानेवारी, २०२० अन्वये सर्व समित्यावरील अशासकीय कार्याध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या असून नवीन समितीचे गठन करण्यासाठी सर्व जिल्हयांना वेळोवेळी कळविण्यात आले असून त्यानुसार २५ जिल्हास्तरीय समित्या गठीत झाल्या आहेत. धुळे जिल्हयासाठी समिती गठनाची कार्यवाही जिल्हास्तरावर सुरु असून तदनंतर मानधन प्रस्ताव मंजूरीची कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## सांगली जिल्हयातील शिराळा व वाळवा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र पूर्ण क्षमतेने सुरु करण्याबाबत

**(२०) * ४०७६५ श्री.मानसिंग नाईक (शिराळा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील शिराळा तालुक्यातील मौजे गुढे पाचगणी, बिळाशी तसेच वाळवा तालुक्यातील चिकुर्डे, वाटेगांव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम पूर्ण असून तेथे कर्मचाऱ्यांची पदे न भरल्यामुळे व साधन सामुग्रीचा अभाव असल्यामुळे सदर आरोग्य केंद्र बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीच्या बांधकामावर कोटयवधी रुपये खर्च करुनही इमारती वापराविना असल्याने येथील नागरिकांना उपचाराकरिता शिराळा किंवा इस्लामपूर येथे जावे लागत असल्याने रुग्णांची गैरसोय तसेच वेळेत उपचार मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्राथमिक आरोग्य केंद्रातील ही सर्व रिक्त पदे भरुन आवश्यक असणारी साधन सामुग्री उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) प्राथमिक आरोग्य केंद्र, चिकुर्डे ता. वाळवा येथे वैद्यकीय अधिकारी यांची ०२ पदे व आरोग्य सहायक-०१, आरोग्य सहायिका-०२ पदे, वाहनचालक-०१ अशी पदे भरलेली असून प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. त्याद्वारे जनतेला आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, वाटेगांव ता. शिराळा येथे वैद्यकीय अधिकारी यांची ०२ पदे भरलेली असून तात्पुरत्या स्वरुपात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी यांची काल्पनिक पदे भरण्याची ई-निविदा प्रक्रियाची कार्यवाही अंतिम टप्यात आहे. तसेच नियमित पदे ग्रामविकास विभागाच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा परिषद स्तरावरुन भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक साधनसामुग्री खरेदीस निधी मिळण्याबाबत सन २०२२-२०२३ च्या जिल्हा नियोजन समितीकडे प्रारुप आराखड्यात मागणी करण्यात आली आहे. दिनांक ०७.०१.२०२२ च्या उच्चाधिकार सचिव समितीच्या बैठकीमध्ये मौजे गुढे पाचगणी व बिळाशी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी पदनिर्मिती करण्यास मान्यता देण्यात आलेली असून, शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धसई (ता.मुरबाड,जि.ठाणे) येथे खासगी दवाखान्याचा अवैध व्यवसाय सुरु केल्याबाबत

**(२१) * ४१८६५ डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धसई (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात गेली अनेक वर्षे शिपाई म्हणून कार्यरत असलेले श्री.पांडूरंग घोलप हे सेवेतून निवृत्त झाल्यानंतर खासगी दवाखान्याचा अवैध व्यवसाय सुरु केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी नागरीकांनी वारंवार आरोग्य विभागाच्या प्रशासनाकडे तक्रारी करुनही या डॉक्टरावर कारवाई न झाल्याने दि.२४ व २६

जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास येथील इंदिरानगर वाडीतील ५ रुग्णांचा मृत्यू झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित बनावट डॉक्टर तसेच याबाबत केलेल्या तक्रारीची दखल न घेणाऱ्या संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) याबाबत चौकशी करण्यात आली असून एकूण 5 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. संबंधित बोगस डॉ.श्री.पांडुरंग दगडू घोलप यांच्याविरुध्द टोकावडे पोलिस स्टेशन येथे दि.26.1.2022 रोजी गुन्हा नोंदविण्यात आला असून संबंधितास पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नगरपरिषद वाडी (जि.नागपूर) येथील वेल ट्रीट मल्टीस्पेशालीटी रुगणालयामध्ये विनापरवानगी सुरू असलेल्या वैदयकीय व्यवसायाबाबत

**(२२) * ३७७६८ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नगरपरिषद वाडी (जि नागपूर) येथील बॉम्बे नर्सिंग ॲक्ट अंतर्गत सन २०१५ पासुन वेल ट्रीट मल्टीस्पेशालीटी रुग्णालयात विनापरवानगी वैद्यकीय व्यवसाय सुरू करण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा शल्य चिकीत्सक, सर्वोपचार रूग्णालय, नागपूर यांनी पत्र क्र.जिशचि/स/न/बॉम्बेनअ/रू/९१६०-६२/२०२१, दिनांक १७/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये रूग्णालय इमारत बांधकाम एकीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार नसल्याने नगरपरिषद वाडी यांनी वैद्यकीय

व्यवसायाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देता येणार नाही असे कळविले आहे, हे ही खर आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालया मधील अतिदक्षता विभागात (आयसीयु वार्ड) दिनांक ९ एप्रिल, २०२१ रोजी वा त्यासुमारास लागलेल्या आगीच्या चौकशी अहवालामध्ये रुग्णालय व्यवस्थापनाने खोटया दस्ताऐवजांचे आधार घेऊन परवानगी मिळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने विनापरवानगी रुग्णालय सुरु केल्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

जिल्हा शल्य चिकित्सक यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार दि.११.८.२०१५ ते ३१.३.२०१८ नोंदणी तसेच दि.१.४.२०१८ ते दि.३१.३.२०२१ पर्यंत नोंदणी नुतनीकरण देण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दि.३१.३.२०२१ रोजी सदर रुग्णालयाकडून नोंदणी नुतनीकरणाबाबतचा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांचेकडे सादर केलेला आहे.

मुख्याधिकारी, नगरपरिषद वाडी, जि.नागपूर यांनी दि.११.११.२०२१अन्वये नाहरकत प्रमाणपत्र नाकारल्याने जिल्हा शल्य चिकित्सक, नागपूर यांनी दि.१७.११.२०२१ अन्वये संबंधीत रुग्णालयास वैद्यकीय व्यवसाय थांबविण्यास कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्हा परिषद अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सॅनिटायझर, मास्क व औषधामध्ये झालेला गैरव्यवहार

**(२३) * ४०५५७ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हा परिषद अंतर्गत कोरोना काळामध्ये माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान ३ कोटी ६१ लाख रुपयांचे सॅनिटायझर, मास्क व औषधे खरेदीमध्ये गैरव्यवहार झाला असल्याचे दिनांक १९ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीच्या सभेत निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी चौकशीचे आदेश दिले आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदअनुषंगाने संबधित दोषीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, कोरोना काळात सॅनिटायझर व इतर औषधी व साहित्याची खरेदी केली. जिल्हा परिषद स्थायी समिती सभेमध्ये जि.प. सदस्यांनी आरोप केला हे खरे आहे, परंतु कोणतीही अनियमितता झालेली नाही. संपूर्ण प्रक्रिया ही शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार व ऊर्जा व उद्योग शासन निर्णय १ डिसेंबर, २०१६ व शासन निर्णय २४ ऑगस्ट, २०१७ नुसार GEM पोर्टल व इ-निविदा द्वारे खरेदी प्रक्रिया राबविण्यात आली.

(२) होय, जिल्हा परिषद स्थायी समिती सभेमध्ये जि.प.सदस्यांनी सॅनिटायझरचा मुद्या उचलून धरला, सदर प्रकरणी चौकशी करावी असे आरोप केले यावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर सॅनिटायझरची गुणवत्ता तपासणीकरीता अन्न व औषध प्रशासन विभागाकडे पाठविण्याची सुचना दिली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हा प्रशासनाकडून तिर्थक्षेत्र निधीमध्ये अनियमितता झाल्याबाबत

**(२४) * ३८५७४ श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा प्रशासनाने सन २०१८-१९ ते २०२०-२१ या कालावधीत जिल्हा नियोजन समितीकडील यादीत समाविष्ट नसलेल्या १४ तिर्थक्षेत्रासाठी निधी वितरीत केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्हा नियोजन अधिकारी यांचेकडून प्राप्त अहवालामध्ये सदर १४ तिर्थक्षेत्र समाविष्ट नसल्याचा अभिप्राय नोंदविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिर्थक्षेत्राच्या प्रस्तावास मान्यता देतांना त्या गावातील तिर्थक्षेत्र कोणते याचा उल्लेख करणे तसेच सदर तिर्थक्षेत्राचे नांव यादीत येणे क्रमप्राप्त असताना जिल्हा नियोजन समितीद्वारा दि. ३१ जानेवारी, २०२१ अखेर प्रकाशित क वर्गीय तिर्थक्षेत्र यादीमध्ये केवळ श्रीक्षेत्र असा ५८ ठिकाणी उल्लेख असल्यामुळे एकाच गावात वेगवेगळया ठिकाणी निधी वितरीत करुन यामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासानाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे. ९ तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी एकूण १३ कामे मंजूर असून त्यापैकी ५ कामांना निधी वितरण झाले आहे.

(२) होय, हे खरे आहे. सदर यादीमध्ये ९ तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी १३ कामांचा समावेश आहे.

(३) अंशत: खरे आहे. जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेल्या यादीमध्ये एकूण ५८ ठिकाणी श्रीक्षेत्र या नावाने “क” वर्ग तिर्थक्षेत्र म्हणून मान्यता दिली आहे. अशा ५८ तिर्थक्षेत्रांपैकी २५ तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी जिल्हा परिषद अमरावती यांचेकडून ४० कामांना निधी मंजूर केला आहे.

(४) जिल्हा परिषद अमरावती यांनी संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासे मागविले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयात आदिवासी क्षेत्रातील गर्भवती व प्रसूती होणाऱ्या महिलांसाठी सुरु केलेली माहेरघर योजना बंद असल्याबाबत

**(२५) * ४११३९ श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी गावातील महिलांसाठी सन २०१०-११ पासून राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत माहेरघर योजना सुरु करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, गोंदिया जिल्हयात आदिवासी क्षेत्रातील गर्भवती व प्रसूती होणाऱ्या महिलांना प्रसूती पूर्वी व प्रसूतीनंतर विश्राम करण्यासाठी माहेरघर योजना सुरु करण्यात आली परंतू आदिवासी महिलांमध्ये जनजागृतीच्या अभावामुळे कोट्यावधी रुपये खर्च करुन उभारण्यात आलेल्या माहेर घर या योजनेचा लाभ आदिवासी भागातील गर्भवतीं महिला घेत नसल्याचे माहे जानेवारी २०२२ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात उभारलेली माहेरघर बंद असल्याने शासनाने त्यासाठी वापरलेला निधी वाया जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे काय,

(४) असल्यास, माहेरघर योजने अंतर्गत आदिवासी गर्भवतींना प्रत्येक दिवसा करीता २०० रुपये बुडीत मजुंरीचा लाभ देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

रुग्णवाहिका पोहचू न शकणाऱ्या पाडयावरील गरोदर मातेस प्रसूती वेदना होण्यापूर्वी बाळंतपणाचे ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी माहेरघर वापरले जाते. गोंदिया जिल्हयात माहे एप्रिल, २०२१ ते जानेवारी, २०२२ पर्यंत १३५ मातांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

(३) अंशतः खरे आहे.

गोंदिया जिल्हयातील १३ माहेरघरांपैकी ७ माहेरघर कार्यान्वित असून ६ माहेरघर दुरुस्तीसाठी बंद आहेत. दुरुस्ती झाल्यानंतर ते कार्यान्वित होतील. अशा ठिकाणी मातांना प्राथमिक आरोग्य केंद्रामधील खोलीत दाखल करुन घेतले जाते.

(४) माहेरघरामध्ये भरती करण्यात आलेल्या गरोदर मातेस दरम्यानच्या काळासाठी प्रतिदिन रु. ३००/- कामाचा मोबदला (बुडीत मजुरी) कमाल ३ दिवसांसाठी अदा करण्यात येते.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## आरोग्य विभागातील भरतीचे प्रक्रियेचे नियोजन नियोजनबध्द करण्याबाबत

**(२६) * ४०९८७ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.रवि राणा (बडनेरा), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरोग्य विभागाच्या गट “क” आणि गट “ड” पदांच्या दिनांक १५ व २६ सप्टेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेला परिक्षांचे नियोजन करण्याची जबाबदारी

शासनाने न्यासा या खासगी कंपनीला दिली होती तथापि या कंपनीच्या नियोजनशुन्य व्यवस्थापनामुळे परीक्षा दोनदा पुढे ढकलाव्या लागल्या असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परीक्षेत झालेला गैरप्रकारांबाबत निवृत्त मुख्य सचिवांकडून चौकशी करण्याची घोषणा मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषींवर तसेच न्यासा कंपनीवर कारवाई करणेसह यापुढील परिक्षांचे नियोजन काटेकोरपणे तसेच नियोजनबध्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि. २५ व २६ सप्टेंबर ,२०२१ रोजी घेण्यात येणाऱ्या परीक्षा पुढे ढकलून दि.२४ व ३१ आक्टोबर,२०२१ रोजी घेण्यात आली.

(२), (३) व (४) होय, हे अंशत: खरे आहे.

मा.मंत्री सा.आ. यांनी घोषणा केली होती. परंतु पेपर फुटीच्या अनुषंगाने सायबर पोलीस ठाणे, पुणे शहर, पुणे येथेदाखल गुन्हा क्र.५३/२०२१ व ६०/२०२१ दाखल होऊन या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे व तपास अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी तपास कामाचा प्रगती अहवाल सादर करण्यात येत आहे.

सदर दाखल गुन्हयात विभागाशी संबंधीत १)श्री. महेश सत्यवान बोटले, प्रभारी सहसंचालक, आरोग्य सेवा (अतांत्रिक) मुंबई २) श्री. प्रशांत व्यंकटराव बडगिरे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, लातूर मंडळ, लातूर ३) डॉ. संदीप त्रिंबकराव जोगदंड, वैद्यकीय अधिकारी, मनोरुग्णालय आंबेजोगाई, बीड ४) श्री. राजेंद्र पांडूरंग सानप, सहा. अधिक्षक, ग्रामीण रुग्णलय, भूमजि. उस्मानाबाद ५) श्री.शाम महादू मस्के, चतुर्थश्रेणी कर्मचारी, स्त्री रुग्णालय

नेकनूर, बीड यांचेसह इतर संशयीत आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सायबर पोलीस स्टेशन पुणे शहर, पुणे यांचेकडून पुढील तपास सुरू आहे. विभागाने संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांचेवर निलंबनाची कारवाई केली आहे. तसेच, संबंधीतांवर मा.न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यासाठी शासनाने मान्यता दिली आहे व आरोपपत्राचा मसुदा विधी व न्याय विभागाच्या मान्यतेस्तव सादर केला आहे. पोलीस अहवालानुसार परिक्षेबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोरोना काळात खाजगी रुग्णालयांनी आकारलेल्या जादा बिलांच्या तक्रारीबाबत

**(२७) * ३८२५१ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत म्हणजे माहे मार्च, २०२१ ते माहे जून, २०२१ या कालावधीत खाजगी रुग्णालयांनी कोरोना रुग्णांकडून जादा बिले आकारण्याच्या अनेक घटना निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी रुग्णालयांवर दर आकारणीवर नियत्रंण रहावे यासाठी शासनाने दर जाहीर केले होते तसेच नागरिकांच्या देयकासंबंधीत तक्रारी सोडवण्यासाठी तक्रार कक्ष देखील स्थापन करण्यात आल्याचे निदर्शनास आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडे या संबंधित प्राप्त झालेल्या तक्रारी, प्रलंबित तक्रारी यांचा तपशील काय आहे, तसेच तक्रारी प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदर तक्रार कक्षाकडे प्रलंबित असलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

शासनाने खाजगी रुग्णालयामध्ये कोविड उपचाराकरिता दराचे नियंत्रण दि.३१/८/२०२१, दि.१/६/२०२१ व १/९/२०२१ रोजीच्या अधिसूचना निर्गमित करुन केले आहे. दर नियंत्रण अधिसूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी राज्य स्तरावरील सक्षम प्राधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी हे असून जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी आहेत. जिल्हाधिकारी/ हानगरपालिका आयुक्त यांनी खाजगी रुग्णालयांमधील कोवीड रुग्णांच्या बिलांचे ऑडीट करण्यासाठी पथके नेमलेली आहेत.

(३) दर नियंत्रण अधिसूचनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिका आयुक्त हे सक्षम प्राधिकारी आहेत.

कोरोनाग्रस्त रुग्णांकडून अधिक बिल आकारल्याच्या/ उपचारास नकार दिल्याच्या तक्रारी अनुषंगाने राज्यभरात एकूण ६८६५१ तक्रारी प्राप्त झाल्या/ बिलांची परीक्षणे करण्यात आली असून त्यापैकी ५८६३१ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून एकूण ३५,७२,४९,४७३ रुपये रुग्ण/ त्यांचे नातेवाईक यांना बिलामधून कमी करण्यात आले/ अतिरिक्त आकारलेल्या रक्कमेचा परतावा करण्यात आला आहे. उर्वरित तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेमध्ये आहेत.

तसेच महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधान मंत्री जन आरोग्य योजनेमध्ये कोविड उपचाराशी संबंधित एकूण २६७४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १७७३ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून रुग्णांना/ त्यांच्या नातेवाईकांना ३,९४,१७,४३५ रुपये इतक्या रक्कमेचा परतावा देण्यात आला आहे. उर्वरित तक्रारी निराकरणाच्या प्रक्रियेमध्ये आहेत.

(४) संबंधित जिल्हाधिकारी/ महानगरपालिका आयुक्त यांना दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्या अर्धशासकीय पत्राद्वारे कोविड १९ बाबत अधिक दर आकारणी संदर्भात प्रलंबित तक्रारींसाठी बिलांची तपासणी करुन पुढील

आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

मा.मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांच्या दिनांक ११/११/२०२१, ७/१/२०२२, २१/१/२०२२ रोजीच्या अर्धशासकीय पत्रान्वये जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना खाजगी रुग्णालयांविरुद्ध कोविड १९ बाबत अधिक दर आकारणी संदर्भात प्रलंबित तक्रारींसाठी बिलांची तपासणी करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील अंगणवाडीत लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

**(२८) * ३८६९७ श्री.सुभाष धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यातील अंगणवाडीत लाभार्थ्यांना वाटप करण्यात आलेले गहू, चना, मुगडाळ इ. धान्य निकृष्ट दर्जाचे असल्याचे दिनांक १० नोव्हेबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार अंगणवाडीमध्ये निकृष्ट दर्जाचे धान्य पुरवठा करण्याऱ्या पुरवठादारांवर कारवाई करणेसह येथील अंगणवाडीतून लाभार्थ्यांना दर्जेदार धान्य मिळावे यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे खरे नाही.

तथापि, चना, मुगडाळ हे निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत दि.९.११.२०२१ रोजी दै.देशोन्नती व दि.१०.११.२०२१ रोजी दै.वृत्त केसरी या वृत्तपत्रात बातमी प्रसिद्ध झाली होती.

(२) व (३) प्रस्तूत प्रकरणी जिल्हा कार्यक्रम अधिकारी(महिला व बाल विकास), जिल्हा परिषद, अमरावती यांचेमार्फत चौकशी करण्यात आली आहे. बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी तालुक्यातील ५ अंगणवाडी केंद्रांचे चना व मुगडाळीचे सॅम्पल प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविले होते. त्यानुसार लाभार्थ्यांना आहार खाण्यास योग्य असल्याचा प्रयोगशाळा अहवाल प्राप्त झालेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील जायकवाडी धरणावरील भूकंपमापक यंत्र बंद असल्याबाबत

**(२९) * ४०००९ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद येथील जायकवाडी धरणावरील भूकंपमापक यंत्र सन २०१७ पासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंपदा विभागाने सदरहू यंत्राची गत २४ महिन्यांपासून दुरुस्ती न केल्याने भूगर्भातील हालचालीची नोंद घेता आलेली नाही, तसेच उक्त यंत्राच्या दुरुस्तीसाठी १४ लाख रुपये खर्च अपेक्षित असून याबाबतचा प्रस्ताव मेरी (महाराष्ट्र इंजिनिअरींग रिसर्च इन्स्टिट्यूट) यांच्याकडे पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने सदरहू यंत्राची दुरुस्ती न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त धरणावरील भूकंपमापक यंत्र त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

जायकवाडी प्रकल्पावरील भूकंपमापक यंत्र सन २०१७ मध्ये नादुरुस्त झाले होते ते सन २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे.

(२), (३) व (४) सदर भूकंपमापक यंत्र हे नोव्हेंबर-१९९४ मध्ये बसविण्यात आले आहे. ते जुन्या तंत्रज्ञानाचे असल्याने दुरुस्ती शक्य नाही. आता नवीन अत्याधुनिक डिजिटल यंत्र बसविणे प्रस्तावित आहे.

धरण सुरक्षितता संघटना, नाशिक यांचे कार्यालयाकडून नविन भूकंपमापन खरेदीकरीता विहित नमून्यातील मागणी पत्र व दरसूची जायकवाडी पाटबंधारे विभाग,पैठण या कार्यालयास पाठविण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यातील धरण स्थळांवरील भूकंपमापक केंद्रे व तेथील उपकरणांचा आढावा व आधुनिकीकरणाबाबत गठीत समितीचा अहवाल शासन स्तरावर विचाराधीन असून निर्णयाअंती आवश्यक कार्यवाही नियोजित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथे श्रेणीवर्धीत झालेले ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत

**(३०) * ३८७७० श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे उमापूर( ता.गेवराई, जि.बीड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन होऊन सन २०१८ मध्ये ग्रामीण रुग्णालयात रुपांतर झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेची जागा शासनाकडे हस्तांतरीत करण्याची प्रक्रिया अद्याप प्रलंबित असल्यामुळे साधारणपणे चार वर्षांपूर्वी मंजूर करण्यात आलेले ग्रामीण रुग्णालय आजतागायत कार्यान्वित होऊ शकले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उमापूर परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या सोयी-सुविधा

मिळाव्यात म्हणून त्वरीत जागा हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण करून सदर ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

मौजे उमापूर (ता. गेवराई, जि.बीड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन झालेले नसून मौजे उमापूर ता. गेवराई जि. बीड येथे, विशेष बाब म्हणून नवीन ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्यास दि. ४ जून २०१९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.
(२) व (३) जागा हस्तांतरण करुन घेण्याबाबतची प्रक्रिया जिल्हा शल्य चिकित्सक, बीड व जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. बीड यांचे स्तरावर सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे रुग्णांवर शस्त्रक्रियेसाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३१) * ३८९२६ श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर येथे सी.टी. स्कॅन मशीन व एम.आर.आय. मशीन मागील अनेक वर्षापासून बंद असल्याने रुग्णांना एम.आर.आय. व सी.टी. स्कॅन स्वखर्चाने बाहेरुन करावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, तेथे म्युकरमायकोसिसच्या रुग्णांवर शस्त्रक्रियेसाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याची बाब देखील माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, येथील शासकीय दंत रुग्णालयात ८० पेक्षा जास्त रुग्ण शस्त्रक्रियेच्या प्रतीक्षेत असून यासाठी लागणाऱ्या निधीसाठी दंत रुग्णालयाकडून विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रस्ताव पाठवूनही निधी

उपलब्ध झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रुग्णालयातील रुग्णांच्या शस्त्रक्रिया करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच एम.आर.आय.व सी.टी. स्कॅन मशीन सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर संस्थेस म्यूकरमायकोसीस आजाराच्या उपचाराकरीता निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच सद्यस्थितीत सी.टी.स्कॅन दुरुस्तीची कार्यवाही संस्थास्तरावरुन सुरु आहे.

हाफकीन महामंडळाने ३ टेस्ला एम.आर.आय. खरेदीचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौजे तिवरे (ता. चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील तिवरे धरणाचे काम पूर्णत्वास नेणेबाबत

**(३२) * ४०४५८ श्री.शेखर निकम (चिपळूण) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.तिवरे (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील तिवरे धरण दिनांक २ जुलै, २०१९ रोजी फुटल्याने तिवरे व आजुबाजूच्या गावांचे नुकसान झाल्यामुळे याच ठिकाणी तिवरे धरणाची पुनर्बांधणी करण्यासाठी भूगर्भतज्ज्ञांकडून पाहणी करण्यात आली असून यास २ वर्षांचा कालावधी होऊनही धरण पुर्नबांधणीच्या कामास अद्याप सुरुवात झाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तिवरे धरणावर अवलंबून असणाऱ्या सुमारे १५ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्याने सदरहू गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असून शेतीस ही पाणी नसल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार

उक्त तालुक्यातील धरणाची पुर्नबांधणी करुन नागरीकांना पिण्यासाठी व शेतीसाठी पाणी लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) तिवरे धरण दुरुस्तीच्या अनुषंगाने वरिष्ठ भूवैज्ञानिक, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक व धरण सुरक्षितता संघटना नाशिक यांनी संयुक्त पाहणी केलेली आहे. सदर संघटनेकडून माती धरण काटच्छेद प्राप्त झाल्यानंतर एम. एस. पाईप पध्दतीचे विमोचकाचे संकल्पन प्राप्त केले जाईल. व सदर संकल्पनास सक्षम स्तरावर मान्यता देवून, योजनेचे पुर्नस्थापनेचे अंदाज पत्रक तयार करण्यात येईल. व त्यास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर योजनेचे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना लाभ मिळत नसल्याबाबत

**(३३) * ३९५३७ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक आर्थिक जातनिहाय जनगणनेनुसार गरीब कुटूंबियांना आरोग्याचा लाभ व्हावा याकरीता केंद्र शासनाने आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत १३५ प्रकारच्या आजारांवर उपचारांची सोय करण्यात आली आहे, तसेच प्रति कुटूंब पाच लाखापर्यंत आरोग्य विमा संरक्षण मिळणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एस.इ.सी.सी.२०११ च्या सर्वेक्षणानुसार सोलापूर जिल्ह्यात ९ लाख ७८ हजार कुटूंबे या योजनेस पात्र असून या सर्व कुटूंबांना गोल्डन कार्ड

वाटप करण्याचे उद्दीष्टे असतानासुध्दा गत दोन वर्षात केवळ ३ लाख ५० हजार कुटूंबांना गोल्डन कार्ड वाटप झालेले असल्याचे माहे ऑगस्ट,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गरजू रुग्णांना या योजनेचा लाभ मिळणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

केंद्र सरकारने प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत आयुष्यमान भारत ही महत्वाकांक्षी योजना लागू केली असून या योजनेअंतर्गत २१३ उपचारांसह एकूण १२०९ उपचारांकरिता प्रति कुटुंब पाच लाखापर्यंत आरोग्य विमा संरक्षण आहे.

(३) व (४) आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट कुटुंबे ही Socio Economic Caste Census-२०११ (जनगणना) मधील ठराविक निकषांनुसार ग्राहय धरण्यात आली आहेत. SECC-२०११ चे सर्वेक्षण केंद्र शासनाच्या अधिपत्याखाली झाले असून पुन्हा नव्याने सर्वेक्षण करून लाभार्थी समाविष्ट करण्याचे सर्व अधिकार केंद्र शासनाकडे आहेत.

सोलापूर जिल्हयात प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसाठी शहरी भागात ८३१२५ कुटुंबे तर ग्रामीण भागात २२९९१० कुटुंबे असे एकूण ३१३०३५ पात्र कुटुंबे आहेत. त्यापैकी ३२९३३६ लाभार्थी व्यक्तिंना आयुष्यमान कार्ड (E-CARD) देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्हापरिषदेच्या वरिष्ट पदावरील अधिकाऱ्यांनी बनावट प्रमाणपत्र दाखल केल्याबाबत

**(३४) * ३८४९४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हापरिषदेच्या वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्याने बनावट अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र दाखल केल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी पुणे जिल्हा परिषदेत, सध्या पंचायत समिती, मुळशी येथे कक्षधिकारी या वरिष्ठ पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्याने हा प्रकार केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी पुणे जिल्हा परिषदेत बनावट जात प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय सेवेत लाभ घेणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या लक्षणीय असून ते मागील अनेक वर्षांपासून त्या आधारे शासकीय लाभ घेत असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त संबंधीत अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय हे, खरे आहे.

(२) होय हे, खरे आहे.

(३) हे, खरे नाही.

(४) श्रीम.नंदन, तत्कालीन सहाय्यक प्रशासन अधिकारी, यांची मुळ नियुक्ती दिनांक ०७/०८/१९८६ रोजीची असल्यामुळे शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ३० जून, २००४ नुसार दिनांक १५ जून, १९९५ पूर्वी शासकीय सेवेत नोकरी किंवा पदोन्नतीने मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांना सेवेतून काढण्यात येऊ नये किंवा पदावनत करु नये असे निर्देश आहेत.

तथापि ससून सर्वोपचार रुग्णालय पुणे यांनी दिलेल्या वैद्यकीय प्रमाणपत्र जा.क्र.ससरु/वै.मंडळ/७००/२०२१, दि.२२.१२.२०२१ नुसार श्रीम.नंदन यांचे डोळयाचे गंभीर आजारपणाच्या कारणास्तव All the fact her case is declared UNFIT due to advaone Glacoma Perform the duties of sectional Officer, असे अभिप्रायासह सादर केल्याने श्रीम.नंदन, यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी वैद्यकीय

कारणास्तव मुदतपूर्व सेवानिवृत्त केले आहे.
(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## अहमदनगर जिल्हा परिषदेतील विकास कामांसाठीचा मंजूर निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(३५) * ३८२३४ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हा परिषदेत गेल्या पाच वर्षात विविध विकास कामांसाठी शासनाचा मंजूर असलेला निधी अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभार व दिरंगाईमुळे अखर्चित राहत असल्यामुळे शासनाकडे परत पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषद सदस्य आपापल्या गटात विविध विकास कामांसाठी निधीची मागणी करत असताना देखील सन २०१७ ते २०२० या तीन आर्थिक वर्षात तब्बल १४१ कोटी ८९ लाख रुपये अखर्चित राहिल्यामुळे निधी परत गेला, तर सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षांचा सुमारे २०८ कोटी रुपयांचा निधी अखर्चित असून तो शासनाकडे परत पाठवावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दुर्लक्ष करणाऱ्या विभागाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) अंशत: खरे आहे.

कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे अर्थव्यवस्थेवरील परिणामाबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ४ मे, २०२० अन्वये अखर्चित रक्कमा शासनास समर्पित करण्याचे निर्देश देण्यात आले असल्याने जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्याकडील अखर्चित

निधी शासन खाती जमा केलेला आहे.

२) हे अंशत खरे आहे.

सन २०१७-१८ ते सन २०१९-२० या वित्तीय वर्षामध्ये रुपये १२१.६२ कोटी इतकी अखर्चित रक्कम वित्त विभागाच्या निर्देशानुसार शासन खाती भरणा करण्यात आली आहे.

सन २०२०-२१ मध्ये जिल्हा परिषदेस प्राप्त झालेला निधी दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत व सन २०२१-२२ या वित्तीय वर्षामध्ये जिल्हा परिषद प्राप्त झालेला निधी दिनांक ३१ मार्च, २०२३ पर्यत वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ अन्वये खर्च करता येईल.

जिल्हा परिषदेने विहित मुदतीत निधी खर्च करणे आवश्यक आहे. निधी मुदतीत खर्च करण्याबाबत जिल्हा परिषदेस शासनाकडून सूचना देण्यात येतील.

(३) वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ अन्वये विहित मुदतीत जिल्हा परिषदेने खर्च करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषदेस सन २०२०-२१ व २०२१-२२ या वित्तीय वर्षातील निधी विहित मुदतीत खर्च करण्याबाबत शासन स्तरावर सूचना देण्यात येतील.

(४) लोकसभा आचारसंहिता, बांधकाम साहित्यात झालेल्या दरवाढीमुळे निविदेस प्रतिसाद न मिळणे, दुष्काळी परिस्थितीमुळे डांबर रिफायनरी बंद असणे, डांबर तुटवडा, शेतकऱ्यांच्या हरकती व कोरोना महामारी इत्यादी कारणामुळे निधी अखर्चित राहिलेला आहे. वित्त विभाग, शासन निर्णय, दिनांक ४ मे, २०२० अन्वये अखर्चित रक्कमा शासनास समर्पित करण्याचे निर्देश असल्याने

जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी त्यांच्याकडील अखर्चित निधी शासन खाती जमा केलेला आहे. वर नमूद कारणामुळे निधी अखर्चित राहिला असल्याने अधिकारी/ कर्मचारी यांच्याविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## मौ.खानू (ता.जि.रत्नागिरी) येथे धरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३६) * ३९७१९ श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.खानू (ता.जि.रत्नागिरी) येथे जलसंधारण (लघुसिंचन) विभागामार्फत सन २००९ मध्ये १३.८७ हेक्टरवर धरण बांधण्यासाठी मंजूरी देऊन रुपये १२ कोटी ९९ लाख इतकी रक्कम सन २०११ मध्ये उपलब्ध करुन दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धरणासाठी ३८ शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करुन दहा वर्षाचा कालावधी होऊनही संबंधित शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत कोणताही मोबदला देण्यात आला नसल्याच्या तक्रारीचे निवेदन शेतकऱ्यांनी दिनांक १५ डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना निवेदनाद्वारे दिली असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धरणाचे काम सुरुवातीला फक्त खोदाई झाले असल्याने त्यासाठी २० ते २५ लाख इतकाच खर्च झाला असताना उर्वरित ११ कोटी रक्कमेचा प्रत्यक्षात झालेल्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहिती अधिकार कायदयांतर्गत माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान प्राप्त झालेल्या माहितीनुसार, धरणासाठी १२ कोटी ९९ लाख २३ हजार रुपये मंजूर झाले, त्यापैकी आतापर्यंत ११ कोटी २९ लाख ३० हजार खर्च झाले असून जमिनीची संयुक्त मोजणी होऊन ३९ लाख (२५ टक्के) रक्कम उपजिल्हाधिकारी भूसंपादन, रत्नागिरी यांचेकडे वर्ग करण्यात आल्याचेही सदर माहितीत नमूद करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, तद्अनुषंगाने संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शंकरराव गडाख :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

साठवण तलाव खानू ता. जि.रत्नागिरी या योजनेची सुधारित प्रशासकीय मान्यता किंमत रु. १२.९९ कोटी आहे. प्रकल्पावर आतापर्यंत रु. १३.७३ कोटी एवढा खर्च झालेला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

सदर योजनेचे जलरोधी खंदकाचे काम तसेच खोदकाम व भराईचे काम पूर्ण झाले आहे. मातीकाम माथा पातळीपर्यंत पूर्ण होऊन उर्ध्व बाजूचे अंशतः मातीकाम करण्यात आलेले आहे. याप्रमाणे आतापर्यंत ६४% काम पूर्ण झालेले आहे. घळीतील काम व प्रस्तावित सांडव्याचे काम सुरु करण्यात आलेले नाही. तसेच या योजनेच्या कामामध्ये कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.

(४) होय, हे खरे आहे.

योजनेच्या धरण, सांडवा व बुडीत क्षेत्रासाठीचा भूसंपादन प्रस्तावानुसार भूसंपादनाची संयुक्त मोजणी २०१३ मध्ये पूर्ण करण्यात आली असून भूसंपादनाची २५% रक्कम (रु. ३९.०० लक्ष) इतकी रक्कम उपलब्ध करून देण्यात आली आहे.

तसेच सदर योजनेच्या भूसंपादन प्रस्ताव प्रकरणी खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करण्याचे नियोजन असताना ग्रामस्थांच्या व ग्रामपंचायतीच्या विनंती निवेदनानुसार भूसंपादन कायदा २०१३ अन्वये भूसंपादन प्रकरणी पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. या भूसंपादन प्रकरणाचा सामाजिक परिणाम अभ्यास (SIA) राजपत्रात प्रसिध्द झालेला आहे. व या प्रकरणाची ३०% आगावू रक्कम रू. १८६.५२ लक्ष उपजिल्हाधिकारी, भूसंपादन, कोकण रेल्वे-१, रत्नागिरी यांचे कार्यालयात जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद जिल्ह्यातील रुग्णालयात औषधाचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(३७) * ४०१८१ श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.कैलास घाडगे पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रात मागील चार महिन्यांपासून औषधाचा तुटवडा भासत असून याबाबत मागणी करूनही रुग्णांना औषधे मिळत नसल्याने त्यांना खाजगी औषधालयांत जाऊन औषधांची खरेदी करावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त रुग्णालयात लागणारी सर्व औषधे उपलब्ध करुन न देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जिल्ह्यातील रुग्णांना औषधांचा पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## तारापूर (जि.पालघर) एमआयडीसीत वारंवार झालेल्या दुर्घटनांबाबत

**(३८) * ३९६१९ श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापूर (जि.पालघर) औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यामधील अपघातांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली असून मागील २ वर्षाच्या

कालावधीत १२ कामगारांचा मृत्यू तर शेकडो कामगार जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२१ मध्ये उक्त ठिकाणच्या कारखान्यांमध्ये झालेल्या स्फोट, वायुगळती अग्निकांड व इतर अपघाताच्या २१ घटना घडल्या आहेत व त्यात प्रामुख्याने बजाज हेल्थकेअर, जसारिया इंडस्ट्रीज, विराज प्रोफाईल प्रीमियर इंटरमीडीएट, सियाराम सिल्कमिल्स रिद्धम टेक्स आय.व्ही.पी. लि. या कारखान्यामध्ये झालेल्या दुर्घटनामध्ये ९ कामगारांचा मृत्यू झाला असून शेकडो कामगार जखमी व कायमस्वरूपी अपंग झाल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त एमआयडीसीत लहान-लहान अपघातांची माहिती संबंधित कारखाने व रुग्णालयांनी स्थानिक पोलीस व औद्योगिक सुरक्षा विभागास न दिल्याने त्यांची नोंद झालेली नाही तसेच अनेक घटना घडूनही औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे दोन वर्षात सेफ्टी ऑडीटच झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त दुर्घटनेतील बहुतांश मृत कामगारांच्या वारसांना कारखाना मालकांकडून अद्याप कोणतीही नुकसान भरपाई देण्यात आली नसून जखमी कामगारांवर अर्धवट उपचार करुन सोडून देणे, पिडीत कामगारांच्या तक्रारींची दखल घेतली जात नसल्याने अनेक कामगार न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे सेफ्टी ऑडीट व मृत कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई न देणाऱ्या संबंधित कंपनीच्या मालकांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच अपघातांच्या वारंवार होणाऱ्या घटना टाळण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) होय, हे खरे आहे,

तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रात सन २०२० या वर्षामध्ये ३९ कारखान्यांमध्ये झालेल्या अपघातात १५ कामगारांचा मृत्यृ झाला असून

६२ कामगार जखमी झाले आहेत. तसेच, सन २०२१ मध्ये ३१ कारखान्यांमध्ये झालेल्या अपघातात ०९ कामगारांचा मृत्यृ झाला असून २८ कामगार जखमी झाले आहेत.

(२) तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यांमध्ये सन २०२१ या वर्षामध्ये बजाज हेल्थकेअर, जखारिया इंडस्ट्रीज, विराज प्रोफाईल, प्रीमियर इंटरमीडीएट, सियाराम सिल्कमिल्स, रिद्धम टेक्स, आय.व्ही.पी.लि. या कारखान्यांमध्ये स्फोट, वायुगळती, आग यासारख्या अपघाताच्या ३१ घटना घडलेल्या आहेत. सदर कारखान्यांच्या ठिकाणी झालेल्या अपघातात ९ कामगारांचा मृत्यू झालेला असून, सदर अपघातांमध्ये २८ कामगार जखमी झालेले आहेत. यापैकी कोणत्याही कामगारास कायमस्वरुपी अपंगत्व आलेले नाही.

(३) गंभीर, प्राणघातक, आग आणि स्फोट यासारख्या घटना अपघातांची माहिती कारखाना व्यवस्थापनांकडून महाराष्ट्र कारखाने नियम १९६३ च्या तरतुदीनुसार नमूना क्र. २४ व २४(अ) नुसार औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयास देणे बंधनकारक आहे.

तारापूर (जि.पालघर) येथील औद्योगिक क्षेत्रातील ०४ कारखान्यांच्या व्यवस्थापनावर अपघाताची सुचना विहीत वेळेत न कळविल्याबद्दल मुख्य न्याय दंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात ०४ फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

कारखाना व्यवस्थापनाने शासन मान्य सुरक्षा लेखा परीक्षक यांचेकडून कारखान्याचे सुरक्षा लेखा परिक्षण करुन घेणे कायदेशीर बंधनकारक आहे. मागील २ वर्षांच्या कालावधीत तारापूर औद्योगिक क्षेत्रातील २१४ कारखान्यांचे सुरक्षा लेखा परिक्षण करण्यात आले आहेत.

(४) सन २०२० मध्ये १५ तर सन २०२१ मध्ये ०९ अशा एकूण २४ कामगारांचा कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत मृत्यू झालेला आहे.

अ) ०८ कामगार हे कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) अंतर्गत नोंदणीकृत असल्याने त्यांच्या वारसास कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) मार्फत नुकसान भरपाई मिळणार आहे.

ब) कर्मचारी राज्य विमा महामंडळ (ESIC) अंतर्गत नोंदणीकृत नसलेल्या १२ मृत कामगारांच्या वारसांना कारखाना व्यवस्थापनाकडून

रु.१,५३,३५,८२५/ इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्यात आलेली आहे.

क) उर्वरीत ०४ कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी आयुक्त, नुकसान भरपाई, ठाणे यांच्याकडे दावा प्रलंबित आहे.

ड) सन २०२० व सन २०२१ या कालावधीत कारखान्यात झालेल्या दुर्घटनेत मृत पावलेल्या कामगारांच्या वारसांना कारखाना व्यवस्थापनाकडून रु.१,५०,८९,४११/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात आलेली आहे.

कारखान्यातील दुर्घटनेत जखमी झालेल्या कामगारांवर आवश्यक वैद्यकीय उपचार करण्यात आले असून, कोणत्याही जखमी कामगारांला अर्धवट उपचारानंतर सोडून देण्यात आलेले नाही.

तसेच, पिडीत कामगारांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने विहीत वेळेत चौकशी पूर्ण करुन त्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(५) सदर प्रकरणांची चौकशी उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पालघर यांचेकडून केलेली आहे.

चौकशीतील निष्कर्षानुसार, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पालघर यांचेमार्फत सुरक्षा लेखा परिक्षण न करणाऱ्या एकूण ०७ कारखाना व्यवस्थापनाविरुद्ध न्यायालयात ०७ फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

मागील २ वर्षात सुरक्षेच्या त्रुटींबाबत एकूण ५१ कारखान्यांविरुद्ध मुख्य न्यायदंडाधिकारी, ठाणे यांच्या न्यायालयात ७७ फौजदारी खटले दाखल करण्यात आले आहेत.

तसेच, अपघातांच्या वारंवार होणा-या घटना टाळण्यासाठी पालघर जिल्ह्यातील एकूण १८ कारखान्यांमधील १८५ कामगारांना कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, परळ मुंबई यांच्या संस्थेमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे.

तसेच, सन २०२१ मध्ये तारापूर औद्योगिक क्षेत्रात ३६० कामगारांना प्रशिक्षण देण्यात आलेले असून एकूण ८० कारखान्यांमध्ये १३९ रंगीत तालीम (मॉक ड्रील) चे आयोजन करुन कारखानदार तसेच कामगारांमध्ये सुरक्षाविषयी जागृती करण्याचे कार्य निरंतर चालू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दुर्ग (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील तलावाचे गेट दुरूस्त नसल्याने पाण्याचा अपव्यय होत असल्याबाबत

**(३९) * ४०३९९ डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दुर्ग (ता.कळंब, जि.यवतमाळ) येथील तलावाचे गेट नादुस्त असल्याने तलावातील पाण्याचा अपव्यय होत असल्याचे दिनाक २५ जानेवारी, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाचे गेट दुरूस्ती करण्याबाबत यापुर्वी सबंधीत विभागाला पत्रव्यवहार व पाठपुरावा केला होता आणि विभागामार्फत निधी उपलब्ध झाल्यावर गेट दुरूस्त करण्यात येईल असे उत्तर देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसरात सतत दुष्काळ पडत असल्याने उक्त तलावाचे गेट ना दुरूस्त असल्याने तलावात जमा झालेले पावसाचे पाणी वाहून जात असून स्थानिक शेतकरी यांना शेती सिंचनाचा कोणताही फायदा होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तदअनुषंगाने सदर तलावाच्या गेटच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत.

**श्री. जयंत पाटील :** (१) होय खरे आहे.

सद्यस्थितीत प्रकल्पावर सिंचन सुरू आहे. रब्बी हंगामाचे सिंचन राबविल्यानंतर यांत्रिकी विभागाकडून गेट दुरूस्ती करण्याचे नियोजन आहे.

(२) होय, खरे आहे,

सन २०२०-२१ मध्ये तात्पुरत्या स्वरूपात गेटची दुरूस्ती करण्यात आली होती. सदर गेट दुरूस्ती करीता बिगर सिंचन देखभाल दुरूस्ती प्रापणसुची सन २०२१-२२ मध्ये निधीची तरतूद करण्यात आलेली असून, दुरूस्ती करून

घेणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) हे खरे नाही.

सद्यस्थितीत प्रकल्पामध्ये १.४९ दलघमी पाणीसाठा शिल्लक आहे. सदर प्रकल्पावर सद्यस्थितीत सिंचन सुरू आहे. यापूर्वीसुद्धा प्रकल्पावर सिंचन झालेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील अपघातग्रस्तांसाठी दहिसर ते खानिवडे टोलनाका दरम्यान रूग्णवाहिकांची सुविधा उपलब्ध करण्याबाबत

**(४०) * ४०६३४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढले असून उक्त अपघातग्रस्तांना सेवा देण्यासाठी दहिसर ते खानिवडे टोलनाका दरम्यान दोन रूग्णवाहीका उपलब्ध आहेत तथापि अजून सहा रूग्णवाहिकांची सुविधा उपलब्ध करण्याबाबत स्थानिक पोलीस प्रशासन, महामार्ग प्रधिकरण, जनप्रतिनिधींनी, वाहन चालक नागरिक तसेच समर्थन संस्थेने मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य, अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तसेच आयुक्त ,आरोग्य संचालनालय यांच्याकडे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केलेली आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर अपघात ग्रस्तांसाठी सहा रूग्णवाहिका उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) हे खरे आहे.

समर्थन संस्थेमार्फत अतिरिक्त रुग्णवाहीकांची मागणी करण्यात आली आहे.

(२) आपत्कालीन वैद्यकीय प्रकल्पांतर्गत मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर व नजीकच्या भागात एकूण १० रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत व तसे समर्थन संस्थेस अवगत करण्यात आलेले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत  नाही.

-----------------

## औरंगाबाद येथील घाटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये जिनोम सिक्वेन्सिंग लॅब सुरू करण्याबाबत

**(४१) * ४१३५२ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओमायक्रॉन या कोरोना विषाणूचे निदान करण्यासाठी जीनोम सिक्वेन्सिंग लॅब अत्यावश्यक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद येथील घाटी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या प्रशासनाने जिनोम सिक्वेन्सिंग लॅब सुरु करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण विभागाकडे परवानगी मागितली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्यापपर्यंत शासनाने जिनोम सिक्वेन्सिंग लॅब सुरु करण्यासाठी कोणतीही परवानगी दिली नसल्यामुळे सध्या पुण्याला नमूने पाठवावे लागत असल्यामुळे अहवाल येण्यास पाच ते सहा दिवस लागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या रुग्णालात जीनोम सिक्वेन्सिंग लॅब सुरू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अमित विलासराव देशमुख :** (१) कोरोना विषाणूचे निदान करण्यासाठी आरटीपीसीआर हे यंत्र पुरेसे आहे. कोरोना विषाणूचे विविध जनुकीय प्रकार (अल्फा, बिटा, डेल्टा+ आणि ओमायक्रॉन) अचूक निदानासाठी जिनोम सिक्वेन्सिंग चाचणी अत्यावश्यक आहे.
(२) नाही.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेण्णी (ता.महागांव,जि.यवतमाळ) येथील अधर पुस या प्रकल्पाअंतर्गत अत्यल्प प्रमाणात शेती सिंचनाखाली येत असल्याबाबत

**(४२) * ४०५६३ श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेण्णी (ता.महागांव, जि.यवतमाळ) येथील अधर पुस या प्रकल्पामुळे १० हजार हेक्टर शेती ओलिताखाली येणार असे सांगण्यात येऊनही सद्यःस्थितीत ३ हजार हेक्टर शेतीही सिंचनाखाली आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कालव्याचे सिमेंट लायनिंग होत नसल्याने पाण्याचा प्रचंड अपव्यय होत असून कालव्यातून ठिकठिकाणी गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पावरील उप अभियंता, कालवा निरिक्षक यांच्यासह विविध संवर्गातील १०० च्यावर पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, तद्अनुषंगाने उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयंत पाटील :** (१) होय अंशत: खरे आहे.

अधर पुस मध्यम प्रकल्पाची सिंचन क्षमता ९११० हेक्टर असुन माहे जानेवारी, २०२२ अखेरपर्यंत एकूण २८६३ हेक्टर इतके सिंचन झालेले आहे. तथापि, सद्यस्थितीत सिंचीत झालेल्या क्षेत्राची मोजणी चालु असून सिंचन क्षेत्रात वाढ संभवते.

(२) होय, अंशत: खरे आहे,

अधर पुस प्रकल्पाच्या डावा मुख्य कालव्यावर पूर्ण लांबीत अस्तरीकरण झालेले नसल्यामुळे थोड्या प्रमाणात पाण्याचा अपव्यय होत आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

अधर पुस प्रकल्पाच्या सिंचन व्यवस्थापनाअंतर्गत पाटबंधारे उपविभाग क्र.४, महागाव (उपविभागीय कार्यालय), पाटबंधारे शाखा उमरखेड(शाखा कार्यालय), पाटबंधारे शाखा, सवना (अधरपूस, शाखा कार्यालय) अंतर्गत एकूण मंजूर पदे ५७ असून भरलेली पदे १५ आहेत व ४२ पदे रिक्त आहेत.

(४) जलसंपदा विभागाचा आकृतीबंध अंतिम न झाल्याने सरळसेवेची पदे भरण्यास सद्यस्थितीत प्रतिबंध आहे. विभागाचा आकृतीबंध अंतिम करण्याची कार्यवाही शासन स्तरावर प्रगतीपथावर आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कोविड या आजारातून बरे झालेल्या रुग्णांना “लाँग कोविड सिंड्रोम” चा धोका जाणवत असल्याबाबत

**(४३) * ४०९८८ श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड या आजारातून बरे होत असलेले अनेक रुग्ण आता “लाँग कोविड सिंड्रोम” या आजाराला सामारे जात असल्याचे दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णांना कित्येक आठवडयांपर्यंत नाक-कान-घसा-श्वसन संस्थेचा तक्रारी उद्भवत असल्याचे निदर्शनास आले आहे,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रुग्णांवर तातडीने मोफत उपचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.

कोविड झालेल्या काही रुग्णांना लाँग कोविड सिंड्रोमचा त्रास होतो. यामध्ये प्रचंड थकवा, श्वास घेण्यास त्रास होणे आणि बोधात्मक अकार्यक्षमता conginitine dysfunction) किंवा ब्रेन फॉग ही लक्षणे सामान्यपणे आढळतात. इतर काही जणांना पचनसंस्था, उत्सर्जन संस्था विषयक लक्षणे देखील आढळतात.

(३) लाँग कोविड संदर्भात रुग्णांवर उपचार करण्यासाठी जिल्हा पातळीवर आणि शासकीय वैद्यकिय महाविद्यायलयामध्ये पोस्ट कोविड बाहयरुग्ण विभाग सुरु करण्यात आले आहे. ज्या कोविड रुग्णांना कोविड मधून बरे झाल्यानंतर देखील आरोग्य विषयक अडचणी येतात त्यांना वैद्यकीय सल्ला घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जाफराबाद (जि. जालना) येथील ग्रामीण रुग्णालयासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(४४) * ४०१८८ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफराबाद (जि.जालना) येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांना पाणी टंचाईचा सामना करावा लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हे ग्रामीण रुग्णालय शहराच्याबाहेर असल्याने या रुग्णालयास स्वतंत्र पाण्याची सोय नाही तसेच तेथील बोअरवेलमधलेही पाणी तळाला गेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुग्णालयात पाणीटंचाई असल्याने रुग्णालयाची स्वच्छता राखण्यास अनेक अडचणी येत असून अधिकारी व कर्मचाऱ्यांची तसेच रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रुग्णालयासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राजेश टोपे :** (१), (२) व (३) ग्रामीण रुग्णालय जाफराबाद हे शहरापासून १ किलोमीटर अंतरावर आहे. रुग्णालय स्थापनेपासून रुग्णालयात बोअरवेल घेतलेले असून त्या बोरवेलचा पाणी पुरवठा रुग्णालय इमारत व अधिकारी-कर्मचारी यांच्या निवासस्थानासाठी करण्यात येतो.ग्रामीण रुग्णालयासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना मिळावी म्हणून नगरपंचायत जाफराबाद यांचेकडे पाठपूरावा करून १ इंच नळाचे कनेक्शन नगरपंचायत जाफ्राबाद यांच्याकडून मिळाले आाहे. नगर पंचायत जाफराबाद यांच्याकडून नळ कनेक्शनव्दारे प्राप्त झालेले पाणी हौदात साठवण करून त्याचा वापर रुग्णालयासाठी केला जातो. तसेच पाणी टंचाई काळात टँकरव्दारे पाणी खरेदी करुन वापर केला जातो.

(४) ग्रामीण रुग्णालय, जाफराबादसाठी कायमस्वरुपी स्वतंत्र पाणी पुरवठा योजना असणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व नगरपरिषद जाफराबाद यांच्याकडे स्वतंत्र पाणीपुरपठा करण्यासाठी वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय जाफराबाद यांच्यामार्फत पाठपुरावा सुरू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील अंगणवाड्यांना स्वत:ची इमारत बांधणे तसेच रिक्त पदे भरण्याबाबत

**(४५) * ४१४५५ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हातील जवळपास ७०६ अंगणवाडीस स्वता:ची इमारत नसल्यामुळे या अंगणवाड्या समाज मंदिर, प्राथमिक शाळा, मंदिराचा ओटा, वसतीशाळा किंवा भाडयाच्या घरात भरत असल्याचे निदर्शनास आले असून येथील जवळपास २२८ अंगणवाडी सेवकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच, वाळूज (जि.औरंगाबाद) गावातील अंगणवाडी क्रमांक १ येथे लाभार्थींना पोषण आहाराची वाटप करण्यात आलेल्या पाकिटामध्ये सडलेल्या अवस्थेत उंदीर आढळून आला असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार निकृष्ट दर्जाचे पोषण आहार वाटप करण्यात आलेल्या प्रकरणासंदर्भात संबधित दोषीवर कारवाई करणेसह औरंगाबाद जिल्हयातील अंगणवाडींना स्वत:ची इमारत बांधणे व रिक्त पदे भरणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे) :** (१) हे अंशत: खरे आहे.
औरंगाबाद जिल्हयात ज्या ठिकाणी अंगणवाड्यांच्या स्वत:च्या इमारती नाहीत त्या ठिकाणी अंगणवाडया समाजमंदिर, प्राथमिक शाळा, मंदिराचा ओटा, वस्तीशाळा किंवा भाडयाच्या घरात भरतात. औरंगाबाद जिल्हयात सद्यस्थितीत अंगणवाडी सेविका व मिनी अंगणवाडी सेविका यांची एकूण १५१ पदे रिक्त आहेत.
(२) हे खरे नाही,
औरंगाबाद येथील अंगणवाडी केंद्रांमध्ये वितरीत केलेल्या आहाराच्या बंद पाकीटामध्ये मृत उंदीर आढळून आले नाहीत. तथापि, लाभार्थ्यांच्या घरी पोषण आहाराच्या पाकिटात मृत उंदीर आढळून आल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.
(३) व (४) बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी अंगणवाडीस प्रत्यक्ष भेट देवून तपासणी केली असता अंगणवाडी स्तरावर शिल्लक राहीलेली गव्हाची पाकीटे फोडून पाहिली असता गहू चांगल्या स्थितीत होता, कोणत्याही पाकिटाला अथवा गव्हाला मृत उंदीराचा वास येत नव्हता तसेच, सदर अंगणवाडी कार्यक्षेत्रातील ८ ते १० लाभार्थ्यांना आहाराच्या गुणवत्ते विषयी विचारणा केली असता त्यांची अन्न, धान्य व किराणा मालाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार आढळून आली नाही. तथापि, सदर मालाचे सॅम्पल प्रयोगशाळा तपासणीचा अहवाल आल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

तसेच जिल्हयात स्वत:ची इमारत नसलेल्या अंगणवाडी केंद्रासाठी इमारत बांधकाम जिल्हा वार्षिक योजनेतून करण्याचे प्रस्तावित आहे.

अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांचे पदभरतीबाबत दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनूसार भरतीची कार्यवाही सूरु असून

भरती प्रक्रिया पूर्ण झालेल्या अंगणवाडी सेविका, मदतनीस, मिनी अंगणवाडी सेविका यांना नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.